संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com




● वर्ष : ७ वे ● ● अंक : १०१ वा ● ● बुधवार दि. २१ फेब्रुवारी २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

# मराठा आरक्षण विधेयक मंजूर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** मराठा समाजाला शिक्षण आणि शासकीय, निमशासकीय सेवांमध्ये १० टक्के आरक्षण देणारे विधेयक मंगळवारी (दि. २०) विधानसभेनंतर विधानपरिषदेतही मंजूर झाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा आरक्षण विधेयक विधानपरिषदेच्या पटलावर ठेवलं. यावर सर्व सदस्यांनी होय म्हणून अनुमोदन दिलं. त्यावर विधान परिषद उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी विधेयक बहुमताने संमत झाल्याची घोषणा केली. या विधेयकात एसईबीसी प्रवर्गातच स्वतंत्रपणे मराठा समाजाला आरक्षण देण्याची शिफारस असून ओबीसीत समावेश केलेला नाही.

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी मंगळवारी सकाळी विषेश अधिवेशनाला राज्यपालांच्या अभिभाषणाने सुरुवात झाली. राज्य मागासवर्ग आयोगाच्या ताज्या अहवालात मराठा समाज हा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास असल्याचं सिद्ध झाले आहे. मराठा समाजाची लोकसंख्या २८ टक्के गृहीत धरून मराठा समाजाला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गात आरक्षण देण्याची शिफारस करण्यात आली आहे. त्यानुसार सरकारने नोकरी आणि शिक्षणात १० टक्के आरक्षण देणारे विधेयक पहिल्यांदा विधानसभेत मांडले. त्यानंतर विधेयक विधीमंडळाच्या वरिष्ठ सभागृहात मांडण्यात आले. विधानपरिषदेतही विधेयक बहुमताने मंजूर झाले.

राज्य सरकारने ओबीसीतून नव्हे तर मराठा समाजाला स्वतंत्रपणे आरक्षण देणारे विधेयक आणली आहे. त्यात देण्यात आलेले १० टक्के आरक्षण हे आधीच्या ५२ टक्के आरक्षणाच्या व्यतिरिक्त आहे. त्यामुळे आधीचे ५२ टक्के, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी केंद्राचे १० टक्के आरक्षण पाहता आता राज्यातील आरक्षणाची टक्केवारी ७२ टक्के होणार आहे.

**मराठ्यांचा ओबीसीत समावेश नाही**

राज्य सरकारने मराठा समाजाला शिक्षण आणि शासकीय, निमशासकीय सेवांमध्ये १० टक्के आरक्षण देणारे विधेयक आणले असून ते काही वेळात विधिमंडळात मांडण्यात आले. या विधेयकात एसईबीसी प्रवर्गातच स्वतंत्रपणे मराठा समाजाला आरक्षण देण्याची शिफारस असून ओबीसीत समावेश केलेला नाही.

**मराठ्यांना शिक्षण आणि नोकर्यांत १० टक्के आरक्षण**

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी मंगळवारी सकाळी विषेश अधिवेशनाला राज्यपालांच्या अभिभाषणाने सुरुवात झाली आहे. मात्र राज्य सरकार मांडणार असलेल्या विधेयकाचा मसुदा मिळाला आहे. राज्य मागासवर्ग आयोगाच्या ताज्या अहवालात मराठा समाज हा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास असल्याचं सिद्ध झाले आहे, मराठा समाजाची लोकसंख्या २८ टक्के गृहीत धरून मराठा समाजाला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गात समाजाला सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गात आरक्षण देण्याची शिफारस करण्यात आली आहे. त्यानुसार सरकारने नोकरी आणि शिक्षणात १० टक्के आरक्षण देणारे विधेयक आणले आहे.

**कायद्याच्या चौकटीत मिळणारे, टिकणारे आरक्षण : मुख्यमंत्री शिंदे**

हा मराठा समाजाचा, मराठा ऐक्याचा विजय आहे आणि हा चिकाटीने दिलेल्या लढयाचा विजय आहे. लाखो करोडो मराठा बांधवांनी आपल्या हक्कांसाठी लढा देताना आजवर संयम सोडलेला नाही. शिस्त मोडली नाही. याबद्दल मी संपूर्ण मराठा समाजाचे, तरुण-तरुणींचे आभार व्यक्त करतो, असे विधीमंडळात बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. राज्यातील मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत मिळणारे, टिकणारे आरक्षण असेल. हा कायदा कोर्टात टिकेल, याबाबत आपण खात्री बाळगूया, असे प्रतिपादन देखील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज (दि.२०) केले. मराठा आरक्षणाबाबत विधीमंडळाचे विशेष अधिवेशन बोलविण्यात आले आहे.यावेळी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते.

## सांगलीसाठी कोयना धरणातून जादा ५०० क्युसेक्स पाणी सोडले : सुहास बाबर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**विटा :** सांगली जिल्ह्यातील पाणीटंचाई दूर होण्यासाठी कोयना धरणातून जादा ५०० क्युसेस पाणी सोडण्याची मागणी सांगली जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सुहास बाबर यांनी सातारचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्याकडे केली होती. त्यावर मंत्री देसाई यांनी कोयना धरणातून जादा ५०० क्यूसेस तात्काळ पाणी सोडण्याचे आदेश दिले. काल दुपारपासूनच कोयनेतून पाणी सोडण्यात आले आहे, असे बाबर यांनी सांगितले.



**मुंबई : मंत्री शंभूराजे देसाई यांना निवेदन सांगली जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सुहास बाबर, विटा नगरपालिकेचे नगरसेवक अमोल बाबर व उपस्थित मान्यवर**

काल मुंबई येथे सुहास बाबर यांनी मंत्री देसाई यांची भेट घेतली कोयना धरणातून सांगली जिल्ह्याला मिळणाऱ्या पाण्यासंदर्भात त्यांनी देसाई यांच्याकडे सविस्तर भूमिका मांडली. यावेळी विटानगर परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अमोल बाबर, युवक नेते प्रकाश बागल, मिथुन सगरे उपस्थित होते. यावेळी सुहास बाबर यांनी देसाई यांना निवेदन दिले.

सुहास बाबर म्हणाले की, सांगली, सातारा जिल्ह्यातील दुष्काळी भागासाठी जीवनदायी ठरलेल्या टेंभू, ताकारी व म्हैसाळ योजनांसाठी कोयना धरणातून कृष्णा नदीमध्ये पाणी सोडले जाते. कोयना धरण या योजनांसाठी व पर्यायाने या भागासाठी वरदान ठरले आहे. सध्या या योजनांचे आवर्तन सुरु असून कमी पर्जन्यवृष्टीमुळे निर्माण होणारी पाणी टंचाई दूर होऊन दुष्काळाची तीव्रता कमी होत आहे. सध्या कोयना धरणातून २ हजार १०० क्युसेक पाणी सोडले जाते. त्यापैकी कोयणा धरण ते कराडपर्यंत उपसा योजना व कारखाने इत्यादीकडून ५०० क्युसेक पाण्याचा वापर होतो. त्यापुढे टेंभू योजनेसाठी एक हजार क्युसेक्स व ताकारी योजनेसाठी ५०० क्युसेक्स असे एकूण दोन हजार क्युसेक्स पाणी उपसा केला जात आहे.

परंतु, यामुळे ताकारी योजनेपासून सांगलीपर्यंत कृष्णा नदी कोरडी पडलेली आहे. त्यामुळे पाणी टंचाई निर्माण होऊन तासगाव, पलूस, सांगली, मिरज आदी शहरांच्या पाणी पुरवठा योजना बंद पडू लागल्या आहेत. त्यामुळे कोयना धरणातून जादा ५०० क्युसेक पाणी सोडल्यास ही पाणी टंचाई दूर होईल. तरी कोयना धरण पायथा व्हॉल्वमधून ५०० क्युसेक जादा पाणी सोडण्याबाबत तत्काळ निर्णय व्हावा, अशी मागणी करण्यात आली. यावर देसाई यांनी संबंधित अधिकाऱ्यांना कोयना धरणातून जादा ५०० क्युसेस पाणी सोडण्याचा आदेश दिले. दुपारपासून हे पाणी सोडण्यात आले.

## आटपाडीच्या दि बाबासाहेब देशमुख सहकारी बँकेला पंढरपूर व जत शाखांना रिझर्व बँकेची मंजूरी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडीच्या दि बाबासाहेब देशमुख बँकेला पंढरपूर व जत या दोन नवीन शाखा उघडणेस रिझर्व बँकेने मंजुरी दिली आहे.



अमरसिंह देशमुख

बँकेची आर्थिक स्थिती रिझर्व बँकेच्या नियमाप्रमाणे भक्कीम असल्यामुळेच व रिझर्व बँकेच्या नियमांचे तंतोतंत पालन बँकेने केल्याने रिझर्व बँकेने या दोन शाखा उघडणेस मंजूरी दिली असलायची माहिती बँकेचे संस्थापक संचालक अमरसिंह देशमुख यांनी दिली असून लवकर या दोन शाखा सुरु करण्यात येणार आहेत.

बँकेच्या सध्या १० शाखा व प्रधान कार्यालय असून या दोन नवीन शाखांमुळे व्यवसाय वाढविणेस मदत होणार आहे. बँकेच्या ठेवी रु. २८९.०० कोटी, कर्जे रु. २७७-५० कोटी, भाग भांडवल रु. १७.८० कोटी, गुंतवणूक रु. १५२९-२८ कोटी तर निव्वळ नफा रु. ४.४९ कोटी आहे. बँकेचा नेट एनपीए ०.०० टक्के असून सीआरएआर १४-७६ टक्के आहे. बँकेला ऑडीट वर्ग सतत अ असून बँकेने मार्च २०२४ अखेर रु. ७०० कोटी व्यवसायाचा टप्पा पूर्ण करण्याचा निर्धार केला आहे. बँकेने ग्राहकांना मोबाईल बँकिंग बरोबरच इतर डिजिटल सेवा ग्राहकांना उपलब्ध करून दिलेल्या आहेत. बँकेचे सर्व संचालक, बँकेचे कर्मचारी, सभासद, कर्जदार, ठेवीदार तसेच, बँकेचे चेअरमन दादासाहेब पाटील, व्हा.चेअरमन जयंत देशपांडे, व्यवस्थापकीय संचालक भगवंत पाटील-आडमुठे व सर्व संचालक यांच्या अथक परिश्रमामुळेच बँकेने भरीव प्रगती केली असल्याचे अमरसिंह देशमुख म्हणाले.

## जरांगे-पाटील 'ओबीसी आरक्षणा'वर ठाम

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राज्य सरकारने मराठा समाजाला नोकरी आणि शिक्षणात आरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी बोलवण्यात आलेल्या एकदिवसीय राज्य विधीमंडळाच्या अधिवेशनात मराठा आरक्षणाचे विधेयक एकमताने मंजूर करण्यात आले. मात्र अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणासाठी उपोषणाला बसलेले मनोज जरांगे यांनी मात्र या विधेयकावर शंका व्यक्त केली. आम्हाला आमच्या हक्काचे आरक्षण हवे आहे. आमच्या कुणबी असल्याच्या नोंदी सापडल्या आहेत. ज्या मराठा समाजाकडे कुणबी असल्याच्या नोंदी नाहीत, त्यांच्यासाठी सरकारने सगेसोयऱ्यांसंदर्भातील अधिसूचना जारी केली आहे. या अधिसूचनेची अंमलबजावणी सरकारने त्वरीत करावी, अशी मागणी जरांगे यांनी केली आहे. ते ओबीसी आरक्षणावर ठाम आहेत. याच पार्श्वभूवर जरांगे यांनी मराठा समाजाला उद्या (२१ फेब्रवारी) अंतरवाली सराटी येथे जमण्यास सांगितले आहे. उद्या दुपारी १२ वाजता मराठा समाजाची येथे बैठक होणार असून या बैठकीत पुढील आंदोलनाची दिशा ठरवली जाणार आहे. अशी माहिती जरांगे यांनी दिली.

आम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सन्मान, आदर केला. त्यामुळेच आम्ही सरकारला सहा महिन्यांचा वेळ दिला होता. आम्हाला समाज महत्त्वाचा आहे. आम्ही प्रत्येक वेळी भावनेत अडकून निर्णय घेऊ शकत नाही. मी माझ्या जातीच्या तरुणांचं नुकसान करू शकत नाही.



त्यांना सरकार चालवताना जशा मर्यादा आहेत, त्याच पद्धतीने मलादेखील काही मर्यादा आहेत. नुसत्या आश्वासनाने आमच्या मुलांचं भविष्य घडणार नाही. पोरांना अभ्यास करावा लागतो, कष्ट करावे लागतात. वयाचे २५ वर्षे मुलं शिक्षणात घालतात. मात्र ऐनवेळी तो नोकरीपासून मुकतो, असे मनोज जरांगे म्हणाले. आम्हाला आमच्या हक्काचे आरक्षण पाहिजे. कोणत्या पद्धतीने आरक्षण द्यायचे आहे, ते सरकारने ठरवावे. सगेसोयऱ्यांबाबतच्या अधिसूचनेविरोधात ज्या हरकती आलेल्या आहेत, त्याबाबत सरकारने काय ठरवायचे ते ठरवावे. मंत्रिमंडळाला काय अधिकार असतात हे मला माहिती आहे. हरकतीचा विषय पुढे करून मराठा समाजाचा अपमान केला जात आहे. मराठा समाजाला हक्कापासून दूर ठेवले जात आहे. हे चुकीचे आहे. सरकारने सगेसोयऱ्यांबाबतच्या अध्यादेशाची त्वरीत अमंलबजावणी करावी, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली.

## ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षणाचा मार्ग मोकळा : देवेंद्र फडणवीस

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राज्य शासनाने मराठा आरक्षणासंदर्भात बोलविलेल्या विशेष अधिवेशनात मराठा समाजाला सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गात शिक्षण व नोकरीमध्ये १० टक्के आरक्षण देण्याचे विधेयक एकमताने मंजूर झाले. त्यामुळे मराठा समाजाला आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे वर्षानुवर्षे एकाच गावात नांदणारे मराठा व ओबीसी बांधव यापुढेही गुण्यागोविंदाने नांदतील व दोन्ही समाजाचा विकास होईल, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानभवन परिसरात पत्रकारांशी बोलताना केले.


विधीमंडळाच्या अधिवेशनाचे कामकाज संपल्यानंतर श्री. फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी ते म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्याचे विधेयक दोन्ही सभागृहात मांडले. दोन्ही सभागृहात हे विधेयक एकमताने मंजूर करण्यात आले आहे.



**मुंबई : विधीमंडळाच्या अधिवेशनाचे कामकाज संपल्यानंतर श्री फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधताना**

यामुळे मराठा समाजाला आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यापूर्वी मी मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला आरक्षण देण्याचा कायदा करण्यात आला. उच्च न्यायालयात तो कायदा टिकला मात्र, सर्वोच्च न्यायालयात यामध्ये त्रुटी काढून आरक्षण रद्द करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने काढलेल्या त्रुटी दूर करून उपाययोजना सुचविण्यासाठी राज्य शासनाने माजी मुख्य न्यायमूर्ती श्री. भोसले यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. या समितीने सुचविलेल्या उपाययोजनानुसार मराठा समाजाला आरक्षण देता यावे यासाठी मागासवर्ग आयोगाकडून सर्वेक्षण करण्यात आले. अडीच कोटीहून जास्त घरांचे सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणाच्या अहवालानुसार मराठा समाजाला आरक्षण देणे योग्य ठरेल, असे मत राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती श्री. शुक्रे व आयोगाने मांडले होते. या अहवालाच्या शिफारसी मंत्रीमंडळाने स्वीकारल्या. समितीच्या शिफारशींवर आधारित हे आरक्षणाचे विधेयक मांडण्यात आले असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. राज्य मागासवर्ग आयोग, या सर्वेक्षणाचे काम करणारे सुमारे ३.५० लाख शासकीय कर्मचारी आणि या विधेयकाला पाठिंबा दिल्याबद्दल विरोधी पक्ष यांचे उपमुख्यमंत्र्यांनी आभार मानले.

मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडविला असून दुसरीकडे मराठा समाजाच्या उत्थानासाठी राज्य शासनाच्या राजर्षी शाहू महाराज संशोधन संस्था म्हणजेच सारथी, अण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळ अशा विविध संस्थांच्या माध्यमातून मराठा समाजातील तरुणाईला निश्चितपणे न्याय मिळेल, असा विश्वास श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला.मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसी समाजाला कुठेही अडचण होईल, त्यांचे आरक्षण कमी होईल, त्यात कुठला वाटेकरी होईल, अशा प्रकारचा मार्ग आम्ही स्वीकारलेला नाही. ओबीसी समाजाला पूर्णपणे संरक्षित केले आहे, असेही श्री. फडणवीस यांनी सांगितले.






# संपादकीय

## मराठ्यांना ओबीसीत आरक्षण नाहीच !

मराठा आरक्षण आंदोलनाचे प्रमुख नेते आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या मूळ मागणीलाच राज्य सरकारकडून वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी सरकारकडून मान्य करण्यात आलेली नाही. ओबीसी आरक्षणऐवजी सरकार मराठा समाजासाठी स्वतंत्र आरक्षण निर्माण करणार आहे. शिक्षण आणि नोकरीत १० टक्के आरक्षण मराठा समाजाला मिळणार आहे. मराठा समाजाबाबत राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल सरकारने स्विकारला आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत या अहवालास मंजुरी दिली आहे. त्यानुसार सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मराठा समाज मागास असल्याचे म्हटले गेले आहे. त्यामुळे मराठा समाजाला नोकऱ्यांमध्ये दहा टक्के आरक्षण आणि शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशांसाठी दहा टक्के आरक्षण देण्याचा मसुदा मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर करण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा मसुदा मंजूर झाला.

मराठा समाजाला ओबीसी मधूनच आरक्षण मिळाले पाहिजे यासाठी मनोज जरागे पाटील यांनी मुंबई येथे आमरण उपोषणाचा इशारा देत मोर्चा काढला होता. तर ओबीसी मधून मराठ्यांना आरक्षण नको म्हणून राज्यातील सर्वपक्षीय ओबीसी नेत्यांनी छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली ओबीसी आरक्षण बचाव सभा घेतल्या. तर राज्य शासनाने मात्र, ओबीसी समाजाला कोणताही धक्का न लावता मराठा आरक्षण देणार असे जाहीर केले होते. त्यानुसार ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता स्वतंत्र आरक्षण मराठा समाजासाठी करण्यात आले आहे. मराठा समाजाचे हे आरक्षण राज्यापुरते मर्यादत असणार आहे. मसुद्यात म्हटले आहे की, मराठा समाजास राज्यात सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग म्हणून मान्यता दिली जात आहे. मराठा समाजाची लोकसंख्या २८ टक्के आहे. खासगी शैक्षणिक संस्था आणि इतर शैक्षणिक संस्थांना हा अध्यादेश लागू करण्यात येणार आहे. राज्य सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण लागू असणार आहे.

मराठा आरक्षणासाठी सादर करण्यात आलेल्या मुसद्यात सर्वात महत्वाची तरतूद म्हणजे दर दहा वर्षांनी आढावा घेण्याची आहे. मराठा समाजाला दिल्या जाणाऱ्या लाभाचा दर दहा वर्षांनी आढावा घेण्यात येणार आहे. आतापर्यंत कोणत्याही आरक्षण तरतुदीचा आढावा घेण्यात आलेला नाही. तसेच कोणत्या संवर्गातील एकल पदाला आरक्षण लागू असणार नाही. पंचेचाळीस दिवसांपेक्षा कमी कालावधीच्या नियुक्तांमध्ये आरक्षण नसणार आहे. बदली किंवा प्रतिनियुक्तीवरील पदांवर आरक्षण लागू असणार नाही. वैद्यकीय, तांत्रिक किंवा शैक्षणिक क्षेत्रातील अतीविशेष पदांना आरक्षण मिळणार नाही. उन्नत आणि प्रगत गटाला आरक्षण लागू होणार नाही असे मसुद्यात नमूद करण्यात आले आहे.

शासनाने दिलेल्या या मराठा आरक्षणावर गुणरत्न सदावर्ते यांनी कायदेशीर बाबीवर ठेवले बोट ठेवले असून ते, म्हणाले, महाराष्ट्र सरकारने घाईघाईने निर्णय घेतला आहे. हा निर्णय घेण्याअगोदर न्यायालयाची वाट सुध्दा बघितली नाही. हा न्यायालयाचा अवमान आहे. एक क्युरेटिव्ही पीटिशन न्यायालयात असताना दुसरा निर्णय घेण्यात आला आहे. हा विषय म्हणजे क्रिकेट मॅच सुरू आहे का?, असा सवाल सदावर्ते यांनी उपस्थित केला. तसेच मराठा आरक्षण कोर्टात टिकणार नाही, असा दावा गुणरत्न सदावर्ते यांनी केला. त्याचे विश्लेषण करताना ते म्हणाले, राज्यात आता ७२ टक्के आरक्षण झाले आहे. म्हणजे खुल्या वर्गासाठी फक्त २८ टक्के आरक्षण उरले आहे. त्यात महिला, क्रीडा, प्रकल्पग्रस्त हे आरक्षण आहे. यामुळे खुल्या वर्गाला काहीच मिळणार नाही. हा खुल्या समाजावर अन्याय आहे. राज्यात मराठा समाजाची लोकसंख्या २८ टक्के आहे. त्यातून आता दहा टक्के आरक्षण देताना कुणबी प्रमाणपत्र आणि आर्थिक उत्पन्न चांगले असणाऱ्यांना वगळण्यात आले आहे. त्यामुळे आता मराठ्यांना ओबीसीत आरक्षण न देता राज्य शासनाने त्यांना मराठा समाज बांधवाना वेगळे १० टक्के आरक्षण दिले आहे.




# महाराष्ट्राच्या सर्वंकष प्रगतीत सर्व क्षेत्रांचे योगदान गरजेचे : रमेश बैस

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** शेतकरी, कामगार, युवकांसह सर्वच समाजघटकांच्या अपेक्षापूर्तीसाठी राज्य शासन काम करीत असून महाराष्ट्राला अधिकाधिक समृद्धीकडे नेण्यासाठीच्या या प्रयत्नांमध्ये सर्वांचा सहभाग आवश्यक आहे. रोजगार निर्मिती, उद्योगक्षेत्रातील गुंतवणूक यामध्येही भरीव वाढ झाली असून २०२७-२८ पर्यंत देशाच्या पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था साध्य करण्याच्या उद्दिष्टाशी अनुरूप अशी राज्याची एक ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था साध्य करण्याचे महत्त्वाकांक्षी ध्येय आपण ठेवले आहे, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केले.

या वर्षीच्या पहिल्या विधीमंडळ अधिवेशनाची सुरूवात संयुक्त सभागृहात राज्यपाल श्री. बैस यांच्या अभिभाषणाने झाली. यावेळी त्यांनी राज्यशासन करीत असलेली विविध विकासकामे आणि ध्येयधोरणांचा आढावा घेतला.

विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, मुख्यमंत्री


मुंबई : विधीमंडळ अधिवेशनाची सुरूवात संयुक्त सभागृहात राज्यपाल रमेश बैस अभीभाषण करताना

एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रीमंडळाचे सदस्य तसेच दोन्ही सभागृहांचे सदस्य उपस्थित होते.

राज्यपाल श्री. बैस म्हणाले की, आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह समाजसुधारकांनी घालून दिलेल्या आदर्शानुसार राज्य शासन काम करत आहे.

कुणबी नोंदी असलेला अभिलेख शोधण्यासाठी आणि मराठा समाजातील पात्र व्यक्तींना मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया निश्चित करण्यासाठी न्यायमूर्ती संदीप शिंदे समिती गठित करण्यात आली होती. त्यानुसार, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीची प्रमाणपत्रे देण्यात येत आहेत. मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्याचे काम राज्य मागासवर्ग आयोगाकडे सोपविण्यात आले होते. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी शासन आवश्यक त्या उपाययोजना करीत आहे.

मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी समाजातील ७५ गुणवंत विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिक्षणासाठी महाराजा सयाजीराव गायकवाड शिष्यवृत्ती योजना सुरू केली आहे. सारथी संस्थेच्या नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई, लातूर, नागपूर, पुणे विभागीय व उपकेंद्र कार्यालयाच्या बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता दिली आहे. स्व. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत १७ हजार ५०० पेक्षा अधिक मराठा समाजातील लाभार्थ्यांना त्यांच्या व्यावसायिक कर्जाकरिता व्याज परतावा म्हणून २३२ कोटी रुपये वितरित केले आहेत, असेही राज्यपाल श्री. बैस यांनी सांगितले.




# इंग्लंडचा माजी कर्णधार लिस्टर कुकने केले यशस्वीचे कौतुक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** भारत आणि इंग्लंड यांच्यातील मालिकेतील तिसरा कसोटी सामना राजकोट येथे खेळला गेला. या सामन्याच्या चौथ्या दिवशी यशस्वी नावाचे वादळ आल्यासारखे वाटत होते. या २२ वर्षीय भारतीय सलामीवीराने दमदार फलंदाजी करताना इंग्लंविरुद्ध षटकारांचा पाऊस पाडला. आपल्या कसोटी कारकिर्दीतील केवळ सातवा सामना खेळणाऱ्या युवा यशस्वीने आपले दुसरे द्विशतक पूर्ण केले. यशस्वीच्या या खेळीचा माजी कर्णधार लिस्टर कुकने कौतुक केले आहे.

लिस्टर कूकने यशस्वी जैस्वालचे कौतुक करताना त्याच्या संपूर्ण कसोटी कारकिर्दीची तुलना राजकोट कसोटीतील भारतीय सलामीवीराच्या स्फोटक खेळीशी केली. इंग्लंडसाठी सर्वाधिक कसोटी धावा करणारा हा अनुभवी खेळाडू यशस्वीबद्दल म्हणाला, 'माझ्या संपूर्ण कारकिर्दीत मी जितके षटकार मारले नाहीत, तितके षटकार यशस्वी जैस्वालने एका डावात मारले.' कूकने २०१८ मध्ये आपल्या १२ वर्षांच्या दीर्घ कसोटी कारकिर्दीला


यशस्वी जैस्वाल

अलविदा म्हटले. १६१ कसोटी सामन्यांमध्ये कुकने ११ षटकारांसह ४६.९५ च्या सरासरीने १२,४७२ धावा केल्या. त्याचवेळी, यशस्वीने राजकोट कसोटीच्या दुसऱ्या डावात १२ षटकार ठोकले.

यशस्वीने राजकोटमध्ये द्विशतक पूर्ण करताच अनेक मोठे विक्रम मोडीत काढले. सलग दोन कसोटी सामन्यांमधील हे त्याचे दुसरे द्विशतक ठरले. यासह ही कामगिरी करणारा तो विनोद कांबळी आणि विराट कोहली यांच्यानंतरचा तिसरा भारतीय ठरला आहे. या इनिंगमध्ये यशस्वीने १२ विक्रमी षटकार ठोकले. तसेच १४ चौकारांचाही समावेश होता. या मालिकेत यशस्वीने आतापर्यंत २२ षटकार मारले आहेत. कसोटी मालिकेत भारतीयाकडून सर्वाधिक षटकार मारण्याच्या बाबतीत त्याने रोहित शर्माला मागे सोडले. रोहित शर्माच्या नावावर एका मालिकेत १९ षटकारांचा विक्रम होता.

# मराठा आरक्षण न्यायालयात टिकेल : एकनाथ शिंदे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राज्यातील मराठा समाज सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास असून त्याला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण आणि नोकरीमध्ये प्रत्येकी १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय महायुती सरकारने घेतल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी विधिमंडळात केली. त्यानुसार या समाजाला आरक्षण देणारे विधेयक विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत चर्चेविना एकमताने संमत करण्यात आले.

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी घेतलेला हा निर्णय ऐतिहासिक, धाडसी आणि कायद्याच्या कसोटीवर टिकणारा असून न्यायालयातही हे आरक्षण टिकविण्यासाठी सरकार सर्व शक्ती पणाला लावेल अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. मराठा समाजास आरक्षण देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात मुख्यमंत्री शिंदे


एकनाथ शिंदे

यांनी मराठा समाजास नोकरी आणि शिक्षणात १० टक्के आरक्षण देण्याची घोषणा करीत या संदर्भातील आरक्षण विधेयक मांडले. विधानसभेत आणि परिषदेतही हे विधेयक चर्चेविना एकमताने संमत करण्यात आले. त्यामुळे मराठा समाजाच्या गेल्या दहा महिन्यांपासून चाललेल्या आंदोलनाला मोठे यश आले आहे.

राज्य मागासवर्ग आयोगाने मराठा समाज सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या मागास असून त्याला संविधानाच्या अनुच्छेद १५(४),१५(५) व १६(४) अन्वये आरक्षण देण्यात यावे अशी शिफारस राज्य मागासवर्ग आयोगाने सरकारला केली आहे. त्यामुळे या मागास समाजाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षण देण्यासाठी असाधारण आणि अपवादात्मक परिस्थिती असून अशा समाजास आरक्षण देण्याचा राज्य सरकारला अधिकार असल्याचे सांगत मराठा समाजास आरक्षण देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत करताच सत्ताधाऱ्यांनी बाके बाजवून या निर्णयाचे स्वागत केले. इतर मागास वर्ग (ओबीसी) अथवा इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला असून मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर नतमस्तक होऊन शपथ घेतल्यानंतर तीन महिन्यांत सरकारने आरक्षणाचा निर्णय घेतल्याचे शिंदे यांनी सांगितले.







दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com
दैनिक
माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस

Email - netra7676@gmail.com
डिजीटल जम्बो
नेत्रा कलर झेरॉक्स
७/१२ उतारे, सर्व शासकीय फॉर्म, मराठी टायपिंग
धिरज, 9503 63 8686 दिपक, 9595 04 7676 गाळा नं. ११



## सहाय्यक पोलीस निरीक्षक ९ हजारांची लाच रंगेहाथ जाळ्यात

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कोल्हापूर :** हुपरी पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस फौजदार यांच्यावर गुन्ह्याचा तपास न करण्यासाठी ९ हजार रुपयाची लाच स्वीकारल्या प्रकरणी कारवाई करण्यात आली आहे. दिलीप योसेफ तिवडे (वय ५५, रा. कदमवाडी कोल्हापूर ) असे त्याचे नाव आहे. ॲन्टी करप्शन ब्युरोने सोमवारी (दि. १९) ही कारवाई केली.

याबाबत अधिक माहिती अशी की, तक्रारदार यांचे त्यांच्या शेजारी राहणारे यांचेबरोबर पाळीव कुत्रे चावल्याचे कारणावरून भांडण झाले होते. त्याबाबत त्यांचेवर एकमेकांवर हुपरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल होता. त्याप्रमाणे तक्रारदार व त्यांचे मुलावर दाखल गुन्हयाचा तपास हुपरी पोलीस ठाणेचे सहायक पोलीस निरीक्षक दिलीप तिवडे हे करीत आहेत. तपासादरम्यान स.पो.नि. तिवडे यांनी तक्रारदार व त्यांचे मुलावर दाखल असले गुन्हयात त्यांना अटक न करणेसाठी व गुन्हयात मदत करतो असे सांगुन त्यांचेकडे १०,०००/- रू. दयावे लागतील अशी मागणी केली. तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये पो.फौ. तिवडे यांनी तक्रारदार यांना त्यांचे मुलास अटक न करणेसाठी व गुन्हयात मदत करतो असे म्हणुन १०,०००/- रूपयांची मागणी करून तडजोडीअंती ९,००० /- रूपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आरोपी लोकसेवक दिलीप योसेफ तिवडे, सहायक पोलीस फौजदार, नेमणुक हुपरी पोलीस ठाणे जि. कोल्हापूर यांनी स्वत: साठी मागणी केलेप्रमाणें तडजोडी अंती ९,०००/- रूपये स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन सदर आलोसे यांचेविरूध्द हुपरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस उपआयुक्त / पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्रीमती डॉ. शितल जानवे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्यान ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार तसेच श्री सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली श्री बापु साळुंके पोलीस निरीक्षक, श्री संजिव बंबरगेकर, श्रेपोसई, पो.हे.कॉ. श्री सुनिल घोसाळकर, पो.ना. सचिन पाटील, मपोकॉ पुनम पाटील, चा पो.हे.कॉ. सुरज अपराध, चा.पो.हे.कॉ. विष्णु गुरव ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

## फॅबटेक पब्लिक स्कूलमध्ये शिवजन्मोत्सव उत्साहात संपन्न



सांगोला : येथे फॅब्रटेक पब्लिक स्कूलमध्ये शिवजन्मोत्सव उत्साहात संपन्न झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची राजमाता जिजाऊ तसेच मावळे यांची वेशभूषा धारण केली होती.

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगोला :** फॅब्रटेक पब्लिक स्कूल अँड ज्यु. कॉलेजमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव अगदी मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे प्राचार्य सिकंदर पाटील, ए.ओ. वर्षा कोळेकर, सुपरवायझर सौ. वनिता बाबर व पालक प्रतिनिधी सौ, सारिका माने हे लाभले. सर्व मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला व विनम्र अभिवादन करण्यात आले.

शिवजयंतीनिमित्त प्रशालेतील विद्यार्थ्यांनी वेगवेगळे गुण प्रदर्शन सादर केले. त्यामध्ये पूर्व प्राथमिक विभागात विद्यार्थ्यांनी शिवकालीन वेशभूषा सादर केल्या. मुलींनी शिवजन्म सोहळ्याचा पाळणा हे समूहगीत सादर केले. इयत्ता वाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवरायांबद्दल चे स्फूर्ती गीत सादर केले. शाळेतील डान्स टीचर अतिश बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थिनींनी 'सवारी निघाली चौकामधी' या गाण्यावर बहारदार नृत्य सादर केले . शिवजयंती निमित्त ज्या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची राजमाता जिजाऊ तसेच मावळे यांची वेशभूषा धारण केली होती, त्या विद्यार्थ्यांनी रॅम्प वॉक करत संवादही सादर केले.

संस्थेचे चेअरमन भाऊसाहेब रुपनर यांनी शिवजयंतीच्या सर्व विद्यार्थ्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांचे विविध गुणधर्म गुणदर्शन पाहण्यासाठी पालकांनीही मोठ्या प्रमाणात शाळेत उपस्थित लावली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. शितल बिडवे यांनी केले. संस्थेचे मॅनेजिंग डायरेक्टर डॉ.अमित रुपनर, कार्यकारी संचालक दिनेश रूपनर, संस्थेचे कॅम्पस डायरेक्टर डॉ. संजय आदाटे, शाळेचे प्राचार्य सिकंदर पाटील, ए.ओ. वर्षा कोळेकर, व सुपरवायझर सौ. वनिता बाबर , सांस्कृतिक विभागाचे प्रमुख डॉ. अमोल रणदिवे यांचे मार्गदर्शन लाभले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे आभार सौ. अनिता शिंगारे यांनी मानले.

## चर्मकार समाजातील नागरिकांच्यासाठी उद्योजकता परिचय मेळावा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी) सांगली द्वारे चर्मकार समाजातील (चांभार, ढोर, होलार व मोची ) युवक, युवती व महिलांकरिता उद्योजकता व तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. या कार्यक्रमाची माहिती चर्मकार समाजातील युवक, युवती महिलांपर्यंत पोहोचावी व त्यांच्यामध्ये उद्योजकता जागृती व्हावी तसेच प्रवेश प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी बुधवार दि. २१ फेब्रुवारी २०२४ रोजी विठ्ठल मंदिर, संत रोहिदास नगर, गावभाग सांगली येथे एक दिवसीय उद्योजकता परिचय कार्यक्रम मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. उद्योजकता व तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन स्वतःचा उद्योग व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या चर्मकार समाजातील युवक, युवती व महिलांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन एम. सी. ई. डी. सांगली चे प्रकल्प अधिकारी दत्तात्रय क्षीरसागर यांनी केले आहे.

मेळाव्यास येताना सोबत प्रवेश अर्जासाठी लागणारी शाळा सोडल्याचा दाखला, मार्कलिस्ट, स्वतःच्या नावाचे जातीचे प्रमाणपत्र, आधार कार्ड, दोन पासपोर्ट साईज फोटो ही आवश्यक कागदपत्रे घेवून यावे. अधिक माहितीसाठी कार्यक्रम सहयोगी, एम. सी. ई. डी. प्रियांका खराडे (मो. नं. ९९७५१८०३३३), शिवाजी त्रिमुखे (मो. नं. ९२७३०९४७६७) यांच्याशी संपर्क साधून स्वतःचा प्रवेश अर्ज भरावा, असे आवाहनही श्री. क्षीरसागर यांनी केले आहे.

## मोफत मोतिबिंदु शस्त्रक्रियेचा लाभ घेण्याचे आवाहन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** केंद्र शासनामार्फत राष्ट्रीय नेत्र ज्योती अभियान सुरू करण्यात आले असून त्याअंतर्गत १९ फेब्रुवारी ते ४ मार्च २०२४ या कालावधीत राज्यात विशेष मोतिबिंदु शस्त्रक्रिया मोहिम राबविण्यात येत आहे. या कालावधीत मोफत मोतिबिंदु शस्त्रक्रियेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विक्रमसिंह कदम यांनी केले आहे.

मोतिबिंदु आजार असणाऱ्यांनी पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकिय रूग्णालय सांगली व शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय मिरज येथे तसेच सांगली जिल्ह्यामध्ये कार्यरत लायन्स आय हॉस्पीटल सांगली, नेत्रसेवा मेडीकल केअर फाऊंडेशन सांगली, टेके आय हॉस्पीटल न्ड साईट सी केअर सोसायटी सांगली, मिसेस ताराबाई परांजपे आय बँक न्ड चॅरिटेबल ट्रस्ट सांगली, नेत्रसेवा फाऊंडेशन सांगली, भारती डिम्ड युनिर्व्हसिटी व हॉस्पीटल सांगली, लायन्स आय हॉस्पीटल एम.आय.डी.सी. मिरज, नॅब आय हॉस्पीटल एम.आय.डी.सी. मिरज व प्रकाश मेडीकल कॉलेज न्ड हॉस्पीटल इस्लामपूर या अशासकिय स्वयंसेवी संस्थेमध्ये मोहिम कालावधीत मोफत शस्त्रक्रियेचा लाभ घेण्याचे आवाहन डॉ. कदम यांनी केले आहे.

## राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबई येथे २६ फेब्रुवारीपासून

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबई येथे सोमवार, दि. २६ फेब्रुवारी ते शुक्रवार, दिनांक १ मार्च या कालावधीत होणार आहे. दरम्यान, राज्याचा अंतरिम अर्थसंकल्प दिनांक २७ फेब्रुवारी रोजी दोन्ही सभागृहात दुपारी दोन वाजता मांडण्यात येणार आहे. विधानभवन मुंबई येथे विधानसभा आणि विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. यावेळी अधिवेशनाच्या कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली.

या बैठकीला विधानसभा अध्यक्ष ड.राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे,विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यासह कामकाज सल्लागार समितीचे सदस्य, विधिमंडळ सचिव जितेंद्र भोळे आदी मान्यवर उपस्थित होते. अर्थसंकल्पिय अधिवेशन २६ फेब्रुवारी २०२४ ते १ मार्च २०२४ या कालावधीत होणार असून, एकूण पाच दिवस कामकाज चालणार आहे.

## कोल्हापूर येथे नर्सिंग महाविद्यालय सुरु करणार : हसन मुश्रीफ

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** कोल्हापूर, येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय परिचर्या महाविद्यालय (नर्सिंग महाविद्यालय) सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले.



हसन मुश्रीफ

मंत्री श्री.मुश्रीफ म्हणाले, राज्यात व देशामध्ये होणारा संसर्गजन्य आजाराचा फैलाव विचारात घेऊन परावैद्यकीय अभ्यासक्रमामध्ये आमूलाग्र बदल करण्याचे शासनाने ठरविले असून त्यादृष्टीने अशी नर्सिंग महाविद्यालये सुरु करण्यात येत आहेत. एकूण ७ शासकीय परिचर्या महाविद्यालयांकरिता पहिल्या चार वर्षांसाठी सुमारे १७३ कोटी ८८ लाख इतका खर्च करण्यात येईल. तसेच पाचव्या वर्षापासून प्रतिवर्ष सुमारे १३ कोटी ९९ लाख इतका निधी देण्यात येईल.

कोल्हापूरसह इतर ४ परिचर्या महाविद्यालयांसाठी बांधकाम, फर्निचर, यंत्रसामुग्री, मनुष्यबळ व दैनंदिन आवर्ती खर्च इ.साठी अंदाजे १०७ कोटी ९४ लाख इतका खर्च अपेक्षित आहे. उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने आवश्यक पदे भरण्यात येतील, असे मंत्री श्री. मुश्रीफ यांनी यावेळी सांगितले.




कलर व त्यासाठी लागणारे सर्व साहित्य मिळण्याचे एकमेव ठिकाण
सिध्दीविनायक कलर एजन्सी
कलरचे माहेरघर...
विजय कालीदास पाटील ८४०८८९९९९४/८४८४०७२४३४
राहूल कालीदास पाटील ७४२०९५०७०७/९८९०५०२३१०
पत्ता
दिघंची रोड जय भवानी बिल्डींग समोर, आटपाडी-शाखा १
दिघंची मायणी रोड दिघंची, शाखा-दिघंची २

## शिवजयंती निमित्त स्वेरीतील २७१ जणांनी केले ऐच्छीक रक्तदान

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पंढरपूर :** गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर संलग्नित असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९४ व्या जयंतीचे औचित्य साधून आयोजिलेल्या रक्तदान शिबीरात डिप्लोमा इंजिनिअरिंगचे ८७ व डिग्री इंजिनिअरिंगचे १८४ रक्तदाते असे मिळून एकूण २७१ विद्यार्थी, विद्यार्थीनी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ऐच्छीक रक्तदान केले.

'शिवजयंती' म्हटलं की तरुणांच्या अंगात एक वेगळीच ऊर्जा संचारते. शिवजयंती साजरी करत असताना सर्वत्र अनेक विधायक उपक्रम राबविले जातात. स्वेरी अंतर्गत असलेल्या पदवी अभियांत्रिकीच्या राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत आणि पदविका अभियांत्रिकी यांच्या वतीने ऐच्छीक रक्तदान शिबीर राबविण्यात आले होते. 'शिवजयंती'च्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सांस्कृतिक विभागाचे समन्वयक प्रा.स्वामीराज भिसे यांच्या हस्ते व मंत्रालयातील सचिव आनंदराव माळी, विवेकवर्धिनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.यु.आर.मुंडे, आर्किड इंजिनिअरिंग कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ.जे. पी. दफेदार, भीमराव जाधव, स्वेरीचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, विश्वस्त बी.डी.रोंगे, श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या व्हाईस चेअरमन व स्वेरीच्या विश्वस्त सौ. प्रेमलता रोंगे, युवा विश्वस्त प्रा.सुरज रोंगे, कॅम्पसचे इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार, डिप्लोमा इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. रविकांत साठे, डॉ. एम.एम. आवताडे, डॉ.डी.एस.चौधरी, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, इंजिनिअरिंग व फार्मसीचे स्टुडंट कौन्सिलचे सचिव आदित्य जगदाळे, पूजा बत्तुल आणि इंजिनिअरिंग व फार्मसीमधील विद्यार्थी यांच्या उपस्थितीत या रक्तदान शिबिराचे उदघाटन करण्यात आले.




पंढरपूर : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९४ व्या जयंती निमित्त स्वेरीच्या इंजिनिअरिंगच्या राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत घेतलेल्या रक्तदान शिबिराचे उदघाटन करताना पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सांस्कृतिक विभागाचे समन्वयक प्रा.स्वामीराज भिसे इतर मान्यवर व रक्तदान करताना विद्यार्थी

यावेळी अक्षय ब्लड बँक, सोलापूर या रक्तपेढीला आमंत्रित केले होते. रक्तपेढीच्या प्रमुख डॉ. सोनिया शहा यांच्या मार्गदर्शनाखाली, त्यांचे जनसंपर्क अधिकारी सागर जाधव व त्यांच्या सहकारी कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत हे रक्तदान शिबिर घेण्यात आले. संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली अभियांत्रिकीचे विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.एम.एस. मठपती. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.आर.एस. साठे, डॉ. डी.एस. चौधरी, डॉ.एम.एम अवताडे, समन्वयक प्रा.के.एस. पुकाळे, प्रा.बी.टी. गडदे, प्रा. एस.बी.खडके, प्रा.जी.जी. फलमारी, प्रा.पी.व्ही. पडवळे, प्रा.एम.ए.सोनटक्के, प्रा.एस.डी. इंदलकर व इतर प्राध्यापकांच्या सहकार्याने हे रक्तदान शिबीर राबविण्यात आले. यावेळी स्वेरीच्या २७१ जणांनी उत्स्फुर्तपणे रक्तदान केले. रक्तदान केल्यानंतर रक्तदात्यांच्या आरोग्याची काळजी रक्तपेढीतील वैद्यकीय अधिकारी व त्यांचे कर्मचारी वर्ग घेत होते. रक्तदानाची प्रक्रिया सुरळीतपणे पार पडण्यासाठी स्वेरीच्या 'मेसा' मधील विद्यार्थी-विद्यार्थीनींनी परिश्रम घेतले.

## सांगलीत ज्येष्ठ नागरीकांसाठी कायदेविषयक शिबीर संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय मुंबई यांच्या कॉमन मिनिमम प्रोग्रॅमनुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सांगली यांच्या वतीने जिल्हा न्यायालय, विजयनगर सांगली येथे सामाजिक न्याय दिनानिमित्त ज्येष्ठ नागरिकांसाठी कायदेविषयक शिबिर संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव पी. के. नरडेले होते.

यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव पी. के. नरडेले यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या कायदेविषयी व पेन्शन लोकअदालतबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून समाज कल्याण



निरीक्षक अमृता लिमये व शितल जाधव उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांची माहिती सांगितली. तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या वृध्दाश्रमाविषयाची व विविध शिष्यवृत्ती विषयी माहिती सांगितली. सूत्रसंचालन जिल्हा विधी सेवा प्राधिकणाचे अधिक्षक एम. एस. गुर्लहसूर यांनी केले. आभार एस. एस. नागणे यांनी मानले. या कार्यकमास ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जमीन वाटपाच्या वादातून वृद्ध महिलेला संपविले



सखुबाई निकम आशिष निकम रेणुका निकम

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**विटा :** जमीन वाटपाच्या वादातून वृद्ध महिलेचा खून झाल्याची घटना खानापूर तालुक्यातील पारे येथे घडली आहे. खून झालेल्या वृद्ध महिलेचे नाव सखुबाई संभाजी निकम (वय ८०) आहे आहे. याप्रकरणी मयत सखुबाई हिची सून रेणुका सतीश निकम (वय ४५), तिचा मुलगा आशिष सतीश निकम (२३ , रा. चिंचणी मं., ता. खानापूर, जि. सांगली) यातील प्रमुख संशयित आहेत. त्यांच्यासह एका अल्पवयीनास विटा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी मृताची मुलगी संगीता रामचंद्र साळुंखे (रा. पारे, ता. खानापूर) यांनी फिर्याद दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, सखुबाई आणि त्यांच्या नातवंडांच्यात जमिनीच्या वाटणीवरून वाद सुरू आहे. त्यामुळे सखुबाई या पारे ता. खानापूर येथे मुलीकडे राहण्यासाठी आल्या होत्या. संशयित रेणुका आणि त्यांच्या मुलांना असे वाटत होते की, सतीश (सखुबाई यांचा मुलगा) याने निम्मी मिळकत आपल्या जावयाच्या कुणालच्या नावावर करावयाची होती. तसे सखुबाई यांना समजावण्यास त्यांनी बहीण संगीता यांना सांगितले होते. त्यामुळे संशयितांनी मंगळवारी पारे येथे साळुंखे यांच्या घरी येऊन धमकी दिली होती, असे फिर्यादीत म्हटले आहे. त्यानंतर मंगळवारी, २० फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास संशयितांनी पारे येथे साळुंखे यांचे घर गाठले. तेथे सखुबाई यांचा गळा टॉवेलने आवळून त्यांना ठार केले आहे, असा आरोप असल्याचे पोलिसांनी सांगितले. घटनास्थळी पारे आणि परिसरातील ग्रामस्थांची गर्दी झाली होती. या घटनेचा पारे येथील साळुंखे कुटुंबाला मोठा धक्का बसला.

# अधिकाधिक युवकांना रोजगार मिळवून देण्यासाठी सूक्ष्मे नियोजन करा

## मंत्री मंगल प्रभात लोढा : पुणे विभागस्तरीय नमो महारोजगार मेळाव्याचे २ मार्च रोजी आयोजन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पुणे :** शासनाच्या कौशल्य, विकास, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्यावतीने पुणे विभागस्तरीय नमो महारोजगार मेळावा २ मार्च २०२४ रोजी बारामती येथे आयोजित करण्यात आला असून औद्योगिक आस्थापनांकडून रिक्त पदांची नोंदणी केली जाईल आणि त्या माध्यमातून अधिकाधिक युवकांना रोजगार मिळवून देता येईल यासाठी सूक्ष्म नियोजन करा, अशा सूचना कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिल्या.



पुणे : विधानभवन पुणे येथे आयोजित महारोजगार मेळाव्याच्या आढावा बैठकीत दूरदृष्यप्रणालीद्वारे मंत्री श्री. लोढा यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बैठकीला उपस्थित अधिकारी

विधानभवन पुणे येथे आयोजित महारोजगार मेळाव्याच्या आढावा बैठकीत दूरदृष्यप्रणालीद्वारे मंत्री श्री. लोढा यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, उपायुक्त वर्षा लड्डा- उंटवाल, कौशल्य विकास विभागाच्या उपआयुक्त अनुपमा पवार आदी उपस्थित होते.

श्री.लोढा म्हणाले, कौशल्य, विकास, उद्योजकता व नाविन्यता धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करतांना सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार, स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी नियोक्ते, कारखानदार, व्यापारी व सुशिक्षित बेरोजगार यांचे एकत्रित मेळावे घेण्यात येत आहेत. मेळावा यशस्वी होण्यासाठी नियोक्त्यांची मागणी आणि त्यानुसार कुशल मनुष्यबळ याचा समन्वय साधण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी औद्योगिक संस्था, महाविद्यालये, रोजगार क्षेत्रात काम करणाऱ्यास संस्था यांच्याशी संवाद साधावा. मेळाव्याचा जास्तीत जास्त सुशिक्षित बेरोजगारांना उपयोग व्हावा यासाठी व्यक्तिमत्व विकास, विविध क्षेत्रातील संधी याबाबत तज्ज्ञांचे मार्गदर्शनही ठेवण्यात यावे, असे त्यांनी सांगितले.

मंत्री श्री.लोढा यांनी पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर व सांगली जिल्हाधिकारी यांनी केलेल्या पूर्वतयारीचा आढावा घेतला. विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार म्हणाले, महारोजगार मेळाव्याची माहिती जास्तीत जास्त सुशिक्षित बेरोजगारांना व्हावी यासाठी विविध माध्यमातून प्रसिद्धी करावी. स्थानिक औद्योगिक संघटनांशी संपर्क साधून रोजगार उपलब्ध होण्यासाठी पाठपुरावा करावा. जिल्ह्यातील मोठ्या उद्योगसंस्थांना मेळाव्यात सहभागी होण्यासाठी आवाहन करण्यात यावे. मेळाव्यात आलेल्या उमेदवारांना कोणतीही समस्या येणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. जिल्हाधिकारी डॉ. दिवसे म्हणाले, मेळाव्यात सुमारे १५० आस्थापना सहभागी होणार असून जागेचे नियोजन, नोंदणी व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि इतर आवश्यक सुविधा करण्यात येत आहेत. युवकांना अधिक रोजगार देणारे क्षेत्र निवडण्यात आले असून नियोक्त्यांशी संपर्क साधण्यात येत आहे. परिसरातील जिल्ह्यातील उमेदवारांनाही या संधीचा लाभ व्हावा यादृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. बैठकीला विभागातील सातारा, सोलापूर,कोल्हापूर व सांगलीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी त्या-त्या जिल्ह्यात करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती दिली.

# 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' लेखक प्रा. कृष्णात खोत यांची मुलाखत




**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात 'जागतिक मातृभाषा दिनानिमित्त' 'रिंगाण' या कादंबरीला साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झालेले कोल्हापूर जिल्ह्यातील लेखक प्राध्यापक कृष्णात खोत यांची मुलाखत प्रसारित होणार आहे.

श्री. खोत यांची ओळख नव्या काळातील मराठी साहित्याला वेगळी दिशा देणारे लेखक म्हणून होत आहे. गावाकडची संस्कृती आणि खेड्यात होत असलेल्या बदलांमुळे निर्माण होत असलेला संघर्ष हे त्यांच्या लिखाणाचे विषय आहेत. श्री. खोत यांच्या गावठाण, झडझिंबड, रौंदाळा आणि धूळमाती या कादंबऱ्यांमधून बदलत्या ग्रामीण जीवनाचं वास्तविक चित्रण आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील निकमवाडी या छोट्याशा खेड्यातील लेखकाचा साहित्य अकादमी पुरस्कारापर्यंतचा प्रवास याविषयी 'दिलखुलास' आणि 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमातून लेखक प्रा. खोत यांनी माहिती दिली आहे.

'दिलखुलास' कार्यक्रमात लेखक प्रा. खोत यांची मुलाखत शुक्रवार दि. २३, शनिवार दि. २४, सोमवार दि. २६ आणि मंगळवार दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व 'न्यूज ऑन एआयआर' या मोबाईल पवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणार आहे. तर 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात ही मुलाखत मंगळवार दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी सायंकाळी ७.३० वा. महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांच्या पुढील लिंकवर ऐकता येणार आहे. प्राध्यापक नंदकुमार मोरे यांनी ही मुलाखत घेतली आहे.











# फसगत करणाऱ्या सरकारने फसवं मराठा आरक्षण दिले : विजय वडेट्टीवार



विजय वडेट्टीवार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राज्य सरकारने मराठा समाजाला दिलेले १० टक्के आरक्षणावरून विरोध पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी या सगळ्यावर टीका केली आहे. सरकारने पुन्हा तेच आरक्षण दिलं आहे हे आरक्षण कोर्टात टिकणार नाही असं वडेट्टीवार म्हणाले आहेत.

राणे समिती, बापट समिती, गायकवाड समिती या सगळ्या अहवालांचं काय झालं? असा प्रश्न विजय वडेट्टीवार यांनी सरकारला विचारला आहे. जे परिपत्रक काढलं त्यावरुन गुलाल उधळला गेला, त्यानंतर विधेयक आलं त्यात मराठा आरक्षण १० टक्के देण्यात आलं. ही निवडणूक मारुन नेण्याची सोय सरकारने केली आहे. हे आरक्षण टिकणार नाही. आम्ही बोलायला उभे राहिलो तेव्हा बोलू दिलं नाही. हे विधेयक म्हणजे फसवं आहे, फसव्या सरकारने हे विधेयक आणलं आहे असं विजय वडेट्टीवार म्हणाले आहेत. एकनाथ शिंदे सरकार फसवं सरकार आहे, शेतकरी बांधव, गरीब लोक, महिला या सगळ्यांप्रमाणेच मराठा समाजाची फसवणूक केली आहे. हे विधयेक म्हणजे ओबीसींना गृहीत धरुन त्यांनाही फसवलं आहे आणि मराठा समाजालाही फसवायचं असा प्रकार सरकारने केला आहे. मराठा समाजाच्या हितासाठी हे ढोल वाजवत नाहीत तर मतं मिळवण्यासाठी ढोल वाजवले जात आहेत असं विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे. तसंच महाराष्ट्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. दोन वेळा नाकारलेलं मराठा आरक्षणच या सरकारने पुन्हा सादर केलं असंही वडेट्टीवार म्हणाले आहेत.

# डीसीसी बँकेच्या नेलकरंजी शाखेत ४८ लाखांचा अपहार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या आटपाडी तालुक्योतील नेलकरंजी शाखेत शाखाधिकारी आणि लिपिकानेच तब्बल ४८ लाखांवर रकमेचा केल्याचा अपहार प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी शाखाधिकारी मच्छिंद्र म्हारगुडे आणि लिपिक प्रतीक पवार या दोघांवर बँकेने तडकाफडकी निलंबनाची कारवाई केली आहे. संबंधितांनी कमी वापर असलेल्या खात्यावरील ठेवी मोडल्याचे तसेच बँकेच्या मासिक व्याजातील रक्क म काढल्याचे स्पष्ट झाले आहे.

जिल्हा बँकेच्या नेलकरंजी शाखेत मासिक व्याजाच्या रकमेत तफावत आल्याचा संशय तालुका अधिकारीयांना आला त्यानंतर शाखेचे अंतर्गत तपासणी सुरू केली. त्यामध्ये अपहार केल्याचे उघडकीस आले. संबंधित शाखाधिकारी म्हारगुडे व लिपिक पवार यांनी दोघांनी संगनमताने अपहार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. जी खाती कमी वापराची आहेत, त्या खात्यावर जादाचे व्याज जमा करून त्यातून पैसे परस्पर काढले आहेत. त्यासाठी संबंधित खात्याच्या नावाने बँकेचे एटीएम स्वत:च घेतले त्याचा मागमुस संबंधित खातेदारांना लागू दिला नसून त्याच एटीएमवरून सर्व पैसे काढण्यात आले. प्राथमिक तपासणीमध्ये ५७ लाख ५९ हजार इतक्या रकमेचा अपहार दिसून येत आहे. त्यापैकी ४८ लाख रुपये खात्यावरून उचलले आहेत.

दरम्यान या प्रकरणी बँकेने संबंधितांना कारणे दाखवा नोटिसा बजावून तात्काळ निलंबनाची कारवाई केली. बँकेच्या लेखापरीक्षकांमार्फत शाखेची अंतर्गत तपासणी सुरू केली आहे. यामध्ये अपहाराची रक्कम वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बँकेकडून संबंधित शाखाधिकारी म्हारगुडे आणि लिपिक पवार यांच्यावर फौजदारी दाखल करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजीराव वाघ यांनी प्रशासनाला दिले आहेत.







माणदेश एक्सप्रेस
व्यवसायिक जाहिरात योजना
आपल्या व्यवसायाचा प्रचार, प्रसार करण्यासाठी दैनिक 'माणदेश एक्सप्रेस' ने आणली आहे अल्प दरात जाहिरात योजना आहे.
आटपाडी तालुक्यासह सांगली तसेच माणदेशातील अग्रगण्य दैनिक माणदेश एक्सप्रेस च्या माध्यमातुन आपली जाहिरात ५० हजार लोकपर्यंत पोहचवा.

| 10 X 5 cm | 10 X 10 cm | 20 X 7 cm | 20 X 13 cm |
|---|---|---|---|
| १०००/- रुपयात महिनाभर | २०००/- रुपयात महिनाभर | ३०००/- रुपयात महिनाभर | ४०००/- रुपयात महिनाभर |

टीप : आतील पानासाठी हे दर १० टक्के कमी आहेत
याशिवाय विशेष स्किम, विविध योजांची माहिती देणाऱ्या बातम्यांना प्रसिद्धी दिली जाईल.
आजच संपर्क करा
९५९५०४७६७६, ९५०३६३८६८६